ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

## सोनिया गांधी रुग्णालयात दाखल



नवी दिल्ली:कॉंग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांना गुडगाव येथील मेदांता रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एका छोट्या शस्त्रक्रियेसाठी त्यांना आज रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांचे एक पथक त्यांच्यावर उपचार करत आहे.

• वर्ष २४ वे • अंक २०५ • बुधवार दि.१३ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

# पेपरफुटी प्रकरणी कठोर उपाययोजना करा

## नीट प्रकरणात फेमाची सुप्रिम कोर्टात याचिका



नवी दिल्ली:देशातील सर्वात महत्त्वाच्या वैद्यकीय प्रवेश परीक्षांपैकी एक असलेल्या नीट-यूजी २०२६ परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले असून हे प्रकरण थेट सर्वोच्च न्यायालयात पोहोचले आहे. फेडरेशन ऑफ ऑल इंडिया मेडिकल असोसिएशन्स (फिमा) यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करत परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या नीटच्या पूर्व परीक्षा ३ मे २०२६ रोजी पार पडल्या. देशभरातील तब्बल २२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नीट परीक्षा दिली होती. मात्र, परीक्षेच्या ४८ तास आधी प्रश्नपत्रिका फुटल्याची माहिती समोर आल्यानंतर देशभरात खळबळ उडाली. या पार्श्वभूमीवर नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) ने ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून अनेक ठिकाणी आंदोलनाची हाकही देण्यात आली आहे.दरम्यान, या प्रकरणाचे नाशिक कनेक्शन समोर आल्यानंतर तपास अधिक गतीने सुरू करण्यात आला असून सध्या केंद्रीय अन्वेषण विभागाकडून (सीबीआय) या प्रकरणाची चौकशी केली जात आहे.फिमाने दाखल केलेल्या याचिकेत भविष्यातील सर्व महत्त्वाच्या परीक्षांसाठी प्रश्नपत्रिकांचे डिजिटल लॉकिंग अनिवार्य करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, संपूर्ण परीक्षा प्रक्रिया न्यायालयाच्या कडक देखरेखीखाली पुन्हा घेण्यात यावी, असेही नमूद करण्यात आले आहे.याचिकेत एनटीएच्या विद्यमान कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले असून, संस्थेमध्ये व्यापक सुधारणा करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. सरकारने एनटीएची पुनर्रचना करावी किंवा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणारी स्वतंत्र परीक्षा संस्था स्थापन करावी, अशी मागणीही फिमाने केली आहे. फेरपरीक्षेसाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे. याशिवाय, पारंपरिक प्रश्नपत्रिका वाहतुकीतील धोका टाळण्यासाठी संगणकाधारित परीक्षा पद्धती (सीबीटी) लागू करण्याची पान ४ वर

# मंत्र्यांसह अधिकाऱ्यांचे परदेश दौरे;ताफ्यातील वाहनांवर मर्यादा

## मुख्यमंत्री फडणवीसांचा मोठा निर्णय

मुंबई/प्रतिनिधी- राज्यातील मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचे परदेश दौरे रद्द करण्यासोबतच मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहने कमी करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज घेतला आहे. यामुळे परकीय चलन, इंधन बचत व प्रशासकीय खर्चावर नियंत्रण मिळविण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याचे सांगण्यात आले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी देशवासियांना पेट्रोल-डिझेलचा मर्यादित वापर करण्याचे, वर्क फ्रॉम होमला प्राधान्य देण्याचे, स्थानिक अर्थात स्वदेशी उत्पादनांचा वापर वाढवण्याचे तसेच किमान वर्षभर सोने खरेदी टाळण्याचे आवाहन केले होते. त्याचबरोबर अनावश्यक परदेश दौरे टाळण्याचाही सल्ला देण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ निर्णय घेत विविध सरकारी कामे आणि अभ्यास दौर्यांसाठी नियोजित असलेले मंत्री व अधिकाऱ्यांचे परदेश दौरे रद्द करण्याचे पान ३ वर

# 'नीट'प्रकरणी लातूरमध्ये चौघांची चौकशी

लातूर/प्रतिनिधी-वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या नीट (यूजी) २०२६ परीक्षेच्या कथित पेपरफुटी प्रकरणात एका विद्यार्थिनीच्या पालकांनी केलेल्या तक्रारीनंतर लातूर पोलिसांनी तपासाची गती वाढवली असून संशयाच्या भोवऱ्यात असलेल्या खासगी क्लासेसची सखोल चौकशी सुरू केली आहे. या प्रकरणी आतापर्यंत चौघांची चौकशी करुन जबाब नोंदविण्यात आले आहेत. या प्रकरणाचा संपूर्ण तपास अत्यंत गुप्ततेत सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.

या प्रकरणात संबंधित क्लास चालकाच्या कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात येत आहे. बुधवारी पहाटे दोन जणांची चौकशी करण्यात आली, त्यानंतर आणखी दोन जणांचे जबाब नोंदवण्यात आले. आतापर्यंत एकूण चार जणांची चौकशी पूर्ण झाली असून पोलिसांकडून प्रत्येक माहितीची बारकाईने पडताळणी केली जात आहे.१२ मे रोजी एका विद्यार्थिनीच्या पालकांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात लेखी तक्रार दिली होती. या तक्रारीत लातूरमधील एका खासगी क्लासेसने परीक्षेपूर्वी घेतलेल्या मॉक टेस्टमधील तब्बल ४२ प्रश्न नीट (यूजी)-२०२६ च्या प्रत्यक्ष परीक्षेत जशाच्या तसे आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाने राज्यभरात खळबळ उडाली आहे.प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी समरजीत साळवे यांच्याकडे चौकशीची जबाबदारी सोपवली आहे. पुढील काही दिवसांत आणखी संबंधितांची चौकशी होण्याची शक्यता असून दोषी आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे संकेत पोलिसांनी दिले आहेत.

# देशात इंधनची कमतरता नाही-ना.हरदीपसिंघ पुरी

नवी दिल्ली:पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर देशात इंधनटंचाई निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात असतानाच, केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी मोठा दिलासा दिला आहे. भारताकडे सध्या ६० दिवसांचा कच्च्या तेलाचा, ६० दिवसांचा एलएनजी (द्रवीकृत नैसर्गिक वायू) आणि ४५ दिवसांचा एलपीजी (घरगुती गॅस) साठा उपलब्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट करत देशात इंधन टंचाई नसल्याचे स्पष्ट केले.

दिल्ली येथे आयोजित सीआयआयच्या वार्षिक व्यावसायिक परिषदेत बोलताना पुरी यांनी सांगितले की, देशात इंधन पुरवठ्याची कोणतीही समस्या नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचतीबाबत केलेल्या आवाहनाचा चुकीचा अर्थ लावण्याची गरज नसल्याचेही त्यांनी नमूद केले.मोदी यांनी सलग दोन दिवस नागरिकांना पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करण्याचे, सार्वजनिक वाहतूक, मेट्रो आणि इलेक्ट्रिक बसचा अधिक वापर करण्याचे आवाहन केले होते. परदेश



प्रवास शक्यतो टाळावा, असेही त्यांनी सुचवले होते.हरदीप पुरी म्हणाले की, पश्चिम आशियातील संकटामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम झाला असला, तरी सरकारने त्याचा भार सामान्य जनतेवर पडू दिलेला नाही. मात्र, याचा मोठा आर्थिक फटका तेल कंपन्यांना बसत आहे. सध्या तेल कंपन्यांना दररोज सुमारे १ हजार कोटी रुपयांचे नुकसान होत असून, हे नुकसान १ लाख ९८ हजार कोटी रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. कच्च्या तेलाच्या किंमतींमध्येही मोठी वाढ झाली आहे. यापूर्वी प्रति बॅरल ६४ ते ६५ डॉलर दर असलेले कच्चे तेल आता ११५ डॉलरपर्यंत पोहोचल्याचे पुरी यांनी स्पष्ट केले.पुरी यांनी सांगितले की, जगातील सुमारे २० टक्के ऊर्जा पुरवठा होर्मुझ सामुद्रधुनीतून होत होता. भारताच्या कच्च्या तेलाच्या आयातीपैकी ८५ टक्के आयात आणि एलपीजीपैकी जवळपास ६० टक्के गॅस याच मार्गाने येत होता. मात्र, तो मार्ग बंद झाल्यानंतर भारताने पर्यायी व्यवस्था उभारली. देशांतर्गत एलपीजी उत्पादनात मोठी वाढ करण्यात आली असून, पूर्वी दररोज ३५ ते ३६ हजार मेट्रिक टन उत्पादन होत होते, ते आता ५४ हजार मेट्रिक टनांपर्यंत वाढवण्यात आले आहे. ही स्वतःमध्ये मोठी कामगिरी असल्याचे पुरी यांनी सांगितले. विशाखापट्टणम, मंगळुरू आणि पाडूर पान ४ वर

# बारामतीत पुन्हा विमान दुर्घटना;जिवीतहानी नाही

बारामती:बारामती तालुक्यात पुन्हा एकदा प्रशिक्षणासाठी वापरले जाणारे छोटे विमान कोसळल्याची घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. बारामतीतील गोजुबावी गावाच्या हद्दीत रेडबर्ड कंपनीचे प्रशिक्षणार्थी विमान अचानक कोसळले. सुदैवाने या दुर्घटनेत वैमानिक सुखरूप बचावल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. काही दिवसांपूर्वी राज्याचे तत्कालिन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान ज्या ठिकाणी कोसळले होते. तेथेच ही दुर्घटना झाली. सुदैवाने प्रशिक्षणार्थी पायलटने प्रसंगावधान लक्षात घेवून स्वतःचा बचाव केल्याने या अपघातात कुठलीही जीवितहानी झाली नाही, परंतु विमानाचे मोठे नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रशिक्षण उड्डाणादरम्यान विमानात तांत्रिक बिघाड झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. विमान अचानक नियंत्रणाबाहेर जाऊन शेतजमिनीत कोसळले. दुर्घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिस आणि संबंधित यंत्रणांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून परिसराचा ताबा घेतला असून अपघाताचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे.विशेष म्हणजे, याच गोजुबावी परिसरात यापूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाशी संबंधित दुर्घटना घडली होती. त्यामुळे पुन्हा त्याच परिसरात विमान कोसळल्याने चर्चांना उधाण आले आहे. दुर्घटनेच्या वेळी शेतात काम करणाऱ्या एका प्रत्यक्षदर्शी महिलेने संपूर्ण प्रसंग कथन करताना सांगितले की, आमच्या घरामागून विमान खाली येताना दिसलं. ते थेट लाईटच्या खांबाला धडकलं. खांबाची बाजू मोडली आणि तारा तुटल्या. विमान धडकल्यावर त्याचं तोंड फिरलं आणि ते घसरत खाली आलं. नाहीतर ते सरळ ऊसाच्या शेतात गेलं असतं. पायलटने मोकळ्या जागेकडे विमान वळवण्याचा प्रयत्न केला, पण झाड आणि खांबाला धडकल्याने ते खाली कोसळलं. दरम्यान, या दुर्घटनेनंतर बारामती परिसरात पुन्हा एकदा विमान सुरक्षेचा मुद्दा चर्चेत आला असून संबंधित यंत्रणांकडून सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे.

# बंजारा आरक्षणासाठी लवकरच समितीची बैठक

## मुख्यमंत्र्यांनी घेतली मंत्री राठोड यांच्या पत्राची दखल

माहूर/प्रतिनिधी-बंजारा समाजाच्या एस.टी. आरक्षणासंदर्भात महाराष्ट्र शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले असून, समाजाचा आदिवासी प्रवर्गात समावेश करण्यासाठी सेवानिवृत्त न्यायमूर्ती एम. एल. तहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीची तात्काळ बैठक घेण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी संबंधित विभागाला दिले आहेत.

बंजारा समाजाच्या एस.टी. आरक्षणाच्या मागणीसंदर्भात शासनाने काही काळापूर्वी ही समिती स्थापन केली होती. मात्र, समिती गठीत होऊन बराच कालावधी उलटल्यानंतरही तिचे कामकाज सुरू झाले नव्हते. याबाबत बंजारा समाजाचे ज्येष्ठ नेते व कॅबिनेट मंत्री संजय राठोड यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र देऊन समितीची तातडीने बैठक घेण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री यांनी आदिवासी विभागाच्या सचिवांना समिती प्रमुखांशी चर्चा करून तात्काळ बैठक आयोजित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच, समितीला आवश्यक शासकीय सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतरच समितीचे कामकाज सुरू होणार असून, यासंदर्भातील प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी मुख्यमंत्र्यांकडे सादर करण्यात आला आहे. मंजुरी मिळताच समितीचे काम तात्काळ सुरू होणार असल्याचे सांगण्यात आले. या विषयावर सातत्याने पाठपुरावा करून शासनाचे लक्ष वेधल्याबद्दल मंत्री नामदार संजयभाऊ राठोड यांचे अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे राष्ट्रीय प्रवक्ता आकाश जाधव यांनी बंजारा समाजाच्या वतीने आभार मानले आहे.

# नांदेड जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेच्या निवडणुकीवर प्रश्नचिन्ह

## अंतिम मतदार यादीत नाव नसतानाही उमेदवारी ग्राह्य;प्रसाद वाघमोडे यांची तक्रार

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या सुरू असलेल्या दैवार्षिक निवडणूक प्रक्रियेत गंभीर गैरप्रकार होत असल्याचे आरोप पुढे आले आहेत. अंतिम मतदार यादीमध्ये नाव नसलेल्या व्यक्तीचे नाव नियमबाह्य पद्धतीने समाविष्ट करून त्याचा उमेदवारी अर्ज ग्राह्य धरण्याचा प्रयत्न होत असल्याची लेखी तक्रार फार्मासिस्ट प्रसाद वाघमोडे यांनी मुख्य निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे केली आहे.

बी.फॉर्म, एलएल.एम. शिक्षण घेतलेल्या प्रसाद वाघमोडे यांनी दिलेल्या हरकत अर्जात निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. अंतिम प्रकाशित मतदार यादीत संबंधित व्यक्तीचे नाव नसताना निवडणूक प्रक्रियेदरम्यान अचानक नाव समाविष्ट करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. वाघमोडे यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर कोणत्याही व्यक्तीचे नाव समाविष्ट करण्यासाठी वैध प्रशासकीय प्रक्रिया, सदस्य मंजुरी आणि अधिकृत दुरुस्ती आवश्यक असते. मात्र संबंधित प्रकरणात सदस्यत्व मंजुरी आदेश, फी भरल्याची नोंद, कार्यकारिणीचा ठराव किंवा सदस्य नोंदवही यांची कोणतीही माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना स्वतःच्या अधिकारात नवीन सदस्य समाविष्ट करण्याचा किंवा अपात्र व्यक्तीस पात्र घोषित करण्याचा अधिकार नसल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. निवडणूक प्रक्रियेदरम्यान विशिष्ट उमेदवाराला लाभ मिळवून देण्यासाठीच संबंधित नाव समाविष्ट करण्यात आल्याचा गंभीर संशय त्यांनी व्यक्त केला आहे.याशिवाय अशा प्रकारची कृती ही समान संधी, निष्पक्ष निवडणूक आणि नैसर्गिक न्याय तत्वांचे उल्लंघन करणारी असल्याचे वाघमोडे यांनी म्हटले आहे. जर निवडक लोकांची नावे नियमबाह्यरीत्या समाविष्ट केली जात असतील तर संपूर्ण निवडणूक प्रक्रियेच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते, असा इशाराही त्यांनी दिला आहे.दरम्यान, संबंधित व्यक्तीचे नाव कोणत्या आदेशाने आणि कोणत्या तारखेस समाविष्ट करण्यात आले याची लेखी माहिती द्यावी, सदस्यत्व मंजुरीची सर्व कागदपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करून द्यावीत तसेच नियमबाह्यरीत्या स्वीकारलेला उमेदवारी अर्ज तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. निष्पक्ष व पारदर्शक निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित न झाल्यास हे प्रकरण सक्षम प्राधिकरण, सहकारी विभाग तसेच न्यायालयीन स्तरावर नेण्यात येईल, असा इशाराही प्रसाद वाघमोडे यांनी दिला आहे. निवडणूक प्रक्रियेतील या आरोपांमुळे नांदेड जिल्ह्यातील औषध विक्रेत्यांमध्ये मोठी चर्चा सुरू झाली आहे.

# तमिळनाडूच्या अग्निपरीक्षेत मुख्यमंत्री थलपती विजय पास

चेन्नई:तमिळनाडू विधानसभेत मुख्यमंत्री विजय थलपती यांच्या नेतृत्वाखालील सरकारने २३४ पैकी १४४ आमदारांची विश्वासदर्शक ठरावाच्या बाजुने मते घेवून बहुमत सिद्ध केले आहे.



तमिळनाडू विधानसभेत २३४ सदस्यांपैकी १४४ आमदारांचा पाठिंबा मिळवून थलपती विजय यांनी विधानसभेत आज बहुमत सिद्ध केले आहे. थलपती विजय यांच्या पक्षाने १०८ जागा जिंकुन सर्वात मोठा पक्ष म्हणून उदय घेतला होता. मात्र, स्वबळावर बहुमताचा आकडा गाठता न आल्याने सरकार स्थापनेसाठी मित्रपक्षांचा पाठिंबा आवश्यक ठरला. त्यानंतर कॉंग्रेस, भारतीय कम्युनिस्ट पक्ष,माकप, विदुथलाई चिरुथैगल काची, इंडियन युनियन मुस्लिम लीग तसेच काही अपक्ष आमदारांच्या पाठिंब्याने सरकार स्थापन करण्यात आले.आज सकाळी विधानसभेचे कामकाज सुरू होताच मुख्यमंत्री विजय यांनी सभागृहात विश्वासदर्शक ठराव मांडला. सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये अल्प चर्चा झाल्यानंतर मतदान प्रक्रिया पार पडली.

# शिक्षणाचे बाजारीकरण थांबवा

**देशाचे भवितव्य घडविण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांच्या खांद्यावर असते. आजचा विद्यार्थी उद्याचा जबाबदार नागरिक, वैज्ञानिक, डॉक्टर, अभियंता आणि प्रशासक म्हणून देशाची धुरा सांभाळणार असतो. त्यामुळे त्यांच्या शिक्षणाशी, मेहनतीशी आणि स्वप्नांशी प्रामाणिक राहणे ही शासन व्यवस्था आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. मात्र अलीकडील नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाने संपूर्ण देश हादरून गेला असून विद्यार्थ्यांच्या भविष्याशी सुरू असलेल्या खेळाचे भीषण वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. वैद्यकीय शिक्षणासाठी घेण्यात येणारी राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा अर्थात ''नीट'' ही लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा महत्त्वाचा टप्पा असते. यंदा मार्च महिन्यात झालेल्या परीक्षेचा पेपर फुटल्याचे उघडकीस आल्यानंतर सीबीआय तपासात प्रश्नपत्रिका आधीच लीक झाल्याचे स्पष्ट झाले. परिणामी राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाला परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घ्यावा लागला. देशभरातील दोन कोटींहून अधिक विद्यार्थी निकालाच्या प्रतीक्षेत होते. अनेक विद्यार्थ्यांनी दहावीनंतर दोन वर्षे प्रचंड मेहनत घेत दिवस-रात्र अभ्यास केला होता. पालकांनीही आपल्या मुलांच्या भविष्यासाठी अक्षरशः पाण्यासारखा पैसा खर्च करून विविध क्लासेस लावले होते. मात्र एका गैरव्यवहारामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या श्रमांवर पाणी फेरले गेले.या प्रकरणाचे धागेदोरे महाराष्ट्रातील नाशिकपर्यंत पोहोचल्याची चर्चा असून त्याचे कनेक्शन लातूरशीही जोडले जात आहे. ही बाब राज्यासाठी अत्यंत चिंताजनक आहे. शिक्षण क्षेत्रात वाढत चाललेली व्यापारीकरणाची प्रवृत्ती अशा घटनांना खतपाणी घालत आहे. वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षणासाठी स्पर्धा तीव्र होत गेल्याने खासगी क्लासेसचे जाळे मोठ्या प्रमाणावर विस्तारले आहे. विद्यार्थ्यांना चांगले गुण मिळवून देण्याच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा व्यवसाय उभा राहिला आहे. शासनाने शाळा आणि महाविद्यालयांवर जशी नियमांची बंधने घातली आहेत, तशी कठोर नियंत्रण व्यवस्था खासगी क्लासेसवर दिसून येत नाही. एका हॉलमध्ये दोनशे-दोनशे विद्यार्थी कोंबून शिकवले जाते आणि पालकही पर्याय नसल्याने मोठ्या फी भरतात. यामुळे अनुदानित महाविद्यालयांमधील विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस घटत आहे. नियमित शिक्षण व्यवस्थेपेक्षा खासगी शिकवणींवर अधिक भर दिला जात आहे. शिक्षणाचे हे बाजारीकरण विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेपेक्षा पैशाला महत्त्व देऊ लागले आहे. अशा वातावरणात पेपरफुटी, कॉपी, गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार वाढणे हे काही आश्चर्यकारक नाही. विशेष म्हणजे, ही काही पहिली घटना नाही. यापूर्वीही २०२४ मध्ये अशाच प्रकारे पेपरफुटीचे प्रकार समोर आले होते. तरीसुद्धा शासनाने ठोस उपाययोजना करण्यात गंभीरता दाखवली नाही. परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणि सुरक्षितता आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, कठोर कायदे आणि दोषींवर तातडीने कारवाई आवश्यक असताना केवळ चौकशांच्या घोषणा केल्या जात आहेत. परिणामी विद्यार्थ्यांचा परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होत आहे. विद्यार्थी हे देशाचे भविष्य असतात, ही केवळ भाषणांतील ओळ राहू नये. त्यांच्या कष्टांचा, प्रामाणिकपणाचा आणि स्वप्नांचा आदर राखणे गरजेचे आहे. जर गुणवत्तेपेक्षा पैशाच्या आणि गैरव्यवहाराच्या जोरावर प्रवेश मिळू लागले, तर देशाच्या आरोग्य व्यवस्थेवर आणि विकास प्रक्रियेवर त्याचे गंभीर परिणाम होतील. कारण उद्याचे डॉक्टर, अभियंते आणि प्रशासक हेच या भ्रष्ट व्यवस्थेतून पुढे येणार असतील, तर समाजाचे नुकसान अटळ आहे. आज गरज आहे ती कठोर आणि पारदर्शक शिक्षण व्यवस्थेची. परीक्षा प्रक्रियेत कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकारांना थारा मिळणार नाही, असा विश्वास विद्यार्थ्यांना देणे आवश्यक आहे. अन्यथा ''विद्यार्थी हा देशाचा कणा आहे'' हे वाक्य केवळ घोषणांपुरते मर्यादित राहील आणि देशाच्या भवितव्याशी सुरू असलेला हा खेळ अधिकच धोकादायक ठरेल.**

# भग्न दगडांपासून अखंड श्रद्धेपर्यंत:सोमनाथची गाथा



भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लवकरच, १३ नोव्हेंबर १९४७ रोजी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री आणि उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल सोमनाथ येथे गेले. समुद्रकिनारी उभे राहून त्यांनी मंदिराच्या भग्नावशेषांकडे गंभीर नजरेने पाहिले आणि एक प्रतिज्ञा केली सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्माणाची. तो क्षण म्हणजे भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाचा पहिला मोठा जागर; आपल्या सभ्यतेच्या स्वाभिमानाच्या सार्वजनिक पुनर्प्राप्तीचा क्षण होता.

आणि आता,११ मे रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सोमनाथ अमृत महोत्सवात उपस्थित राहून मंदिराच्या पुनर्स्थापित तेजात सहभाग घेतला, तेव्हा तीच प्रतिज्ञा पुन्हा नव्याने प्रज्वलित झाल्यासारखी वाटते. विशेष महापूजा, कुंभाभिषेक, ध्वजारोहण आणि लाखो भाविकांची उपस्थिती. हे सर्व मिळून भग्नावस्थेतून पुनर्निर्माणाकडे आणि पुनरुत्थानाकडे झालेल्या अखंड प्रवासाची घोषणा करतात. सरदार पटेलांच्या दूरदृष्टीपासून आजच्या आत्मविश्वासपूर्ण भारतापर्यंतचा हा अखंड सांस्कृतिक प्रवाह आहे. ही परंपरा, कालातीत आणि प्रेरणादायी, प्रत्येक पिढीला आपल्या वारशाचे जतन करण्याचे, ऐक्याचे रक्षण करण्याचे आणि भारताच्या सनातन आत्म्यावर दृढ श्रद्धा ठेवत समृद्ध, सुसंवादी आणि अखंड भविष्याकडे वाटचाल करण्याचे आवाहन करते.

अमेरिकन लेखक मार्क ट्वेन यांनी एकदा म्हटले होते की वाराणसी इतिहास, परंपरा आणि आख्यायिकांपेक्षाही प्राचीन आहे. पण कदाचित त्यांनी प्रभास पाटण आणि सोमनाथ पाहिले नसावे. भागवत पुराणानुसार, चंद्राला त्याचे सासरे दक्ष यांनी शाप दिला होता. त्या शापातून मुक्त होण्यासाठी चंद्राने याच स्थळी भगवान शिवाची आराधना केली आणि म्हणूनच सोमनाथ-चंद्राचा अधिपती हे नाव उदयास आले.मंदिर उभे राहण्याच्या खूप आधीपासून प्रभास पाटण हे मानवी वस्तीचे केंद्र होते. इ.स.पू. ३००० पासून येथे शेती आणि पशुपालन करणारी पूर्व-हडप्पा संस्कृती अस्तित्वात होती. सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासानंतरही येथे जीवन टिकून राहिले. येथे सापडलेली रेड पॉलिश्ड वेअर मातीची भांडी आणि प्रारंभीच्या लिपींचे पुरावे याची साक्ष देतात. इसवी सनाच्या प्रारंभीच्या शतकांत हे एक साधे पण महत्वाचे नगर होते. समुद्र किनाऱ्या लगत ७ ते १० मीटर खोलीवर सापडलेले दगडी नांगर प्राचीन सागरी व्यापाराचे साक्षीदार आहेत.हा किनारा केवळ निसर्गरम्य नव्हता, तर व्यापाराचे प्रवेशद्वार होता. येथे वस्ती आणि पवित्रता एकत्र वाढत गेली.

प्राचीन ग्रंथांमध्ये प्रभास क्षेत्राला तीर्थ म्हणून संबोधले आहे. महाभारतामध्ये भगवान कृष्णाच्या देहत्यागाचे स्थळ म्हणून प्रभासाचा उल्लेख आहे. दगडांनी अमरत्वाची भाषा शिकण्यापूर्वीच हा किनारा सांसारिक आणि आध्यात्मिक जगामधील एक पवित्र संगम होता. त्याची प्रारंभीची रूपे साधी ''लाकूड आणि गवताची'' असली, तरी ती मानवी मनाच्या दैवी शोधाची खूण होती.इ.स. ६४९ च्या सुमारास वल्लभीच्या मैत्रक राजवटीत पहिले ऐतिहासिकदृष्ट्या प्रमाणित मंदिर उभे राहिले. पुढे ९ व्या१० व्या शतकात चालुक्य/सोलंकी काळात सोमनाथ हे काशी आणि उज्जैनच्या बरोबरीचे प्रमुख तीर्थस्थान बनले. पुरातत्त्ववेत्ता बी. के. थापर यांना १९५०५१ मधील उत्खननात असलेले गर्भगृह, अंतराळ आणि सभामंडप यांचा समावेश असलेली भव्य रचना. पूर्वाभिमुख त्रि-अंग संधार प्रासादाचे अवशेष सापडले. लक्षुलीश मूर्तीच्या अवशेषांनी त्याची शैव परंपरा सिद्ध केली. विद्वान मंदिराच्या नेमक्या कालखंडावर मतभेद करतात, परंतु एक गोष्ट निर्विवाद आहे.सोमनाथ त्या काळात अत्यंत वैभवशाली झाले होते आणि लवकरच त्याची कठोर परीक्षा होणार होती.

**ब्रिजेश सिंह**
प्रधान सचिव तथा महासंचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

ही परीक्षा अनेक लाटांमध्ये आली. इ.स. ७२५ मध्ये उमय्यद सेनापती जुनैद इब्न अब्द अल-रहमान अल-मुरीने हल्ला केला, जो पहिला इस्लामी आक्रमण मानला जातो. परंतु सर्वात मोठा आघात ८ जानेवारी १०२६ रोजी झाला, जेव्हा गझनीचा महमूद आपल्या पंधराव्या मोहिमेत सोमनाथावर चालून आला. शिवलिंग फोडण्यात आले, खजिना लुटण्यात आला. अल बिरुनी यांनी मंदिरातील संपत्तीचे वर्णन केले आहे. सोने, चांदी, मोती, रत्ने आणि गावांच्या महसुलातून जमा झालेली संपदा.तथापि, पुरातत्त्वीय पुरावे दर्शवतात की मंदिराचे भग्नावशेष त्वरित एकत्र करून सुरक्षितपणे पुरले गेले. म्हणजेच, श्रद्धा उद्ध्वस्त झाली नव्हती. इ.स. १०३८ मध्ये गोव्याच्या कदंब राजाने सोमनाथाला भेट दिली, यावरून पूजा-अर्चा किंवा पुनरुज्जीवनाची भावना त्वरित पुन्हा उभी राहिल्याचे दिसते. मंदिराचे रूप तुटले, पण संस्कृतीचे चेतन कायम राहिले.

पुढील काळातही विध्वंस आणि पुनर्निर्माण यांचे चक्र सुरूच राहिले. इ.स. ११६९ मध्ये सोलंकी राजा कुमारपालाने पाचवे भव्य दगडी मंदिर उभारले. प्रभास पाटण येथील भद्रकाली मंदिरातील शिलालेखात त्याचा उल्लेख आहे.त्यानंतर १२९९ मध्ये अलाउद्दीन खिलजीचा सेनापती उलुघ खानने मंदिर उद्ध्वस्त केले. स्थानिक रक्षक वाजा मालसुत आणि पदमल यांनी मंदिररक्षण करताना प्राण दिले. पुढे चुडासमा राजा महिपाल देव यांनी १३०८ मध्ये मंदिराचे पुनर्निर्माण केले आणि त्यांचा पुत्र खेङ्गाराने शिवलिंगाची पुनःप्रतिष्ठा केली.यानंतर झफर खानने १३९५ मध्ये मंदिर उद्ध्वस्त करून तेथे जामा मशिद आणि प्रशासकीय ठाणे उभारल्याचे उल्लेख आहेत. पुढे महमूद बेगडा, पोर्तुगीज आक्रमक, आणि नंतर औरंगजेब यांच्या आदेशाने १६६५ आणि १७०६ मध्ये पुन्हा विध्वंस घडवून आणण्यात आला. पुजाऱ्यांची हत्या, मंदिर परिसरातील अपवित्र कृत्ये आणि संपूर्ण रचना पाडण्याचे प्रयत्न झाले; परंतु तीर्थक्षेत्र टिकून राहिले.

जरी मंदिर वारंवार उद्ध्वस्त झाले, तरी स्मृती कधीच नष्ट झाली नाही. इ.स. १७८२८३ मध्ये पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या वैयक्तिक निधीतून सोमनाथाजवळ नवीन दगडी मंदिर उभारले. हे मंदिर १९ व्या आणि २० व्या शतकात सोमनाथच्या श्रद्धेचे केंद्र राहिले.१८४२ मध्ये ब्रिटिश गव्हर्नर-जनरल लॉर्ड एलेनबरो यांनी अफगाणिस्तानातील महमूद गझनीच्या कबरीतून चंदनाचे दरवाजे आणले आणि ते सोमनाथचे मूळ दरवाजे असल्याचा खोटा दावा केला. हा ब्रिटिश सत्तेचा हिंदू समाजाचे समर्थन मिळवण्यासाठी आणि ब्रिटिश राजवटीला वैध ठरवण्यासाठी राजकीय प्रचार होता. हे दरवाजे नंतर आग्रा किल्ल्यात ठेवण्यात आले. १९२२ मध्ये के.एम. मुन्शी यांनी सोमनाथचे भग्नावशेष पाहिले. त्यांनी त्या अनुभवाचे वर्णन भक्ती आणि लज्जा असे केले आणि याच अनुभवातून त्यांच्या मनात मंदिर पुनर्निर्माणाची आजीवन बांधिलकी निर्माण झाली.

स्वातंत्र्यानंतर सोमनाथच्या इतिहासाचे अंतिम पर्व सुरू झाले. ऑक्टोबर १९४७ मध्ये जुनागढ भारतात विलीन झाले आणि हिंदूंना मंदिर दुरुस्तीवरील बंदी हटवण्यात आली. १२१३ नोव्हेंबर १९४७ रोजी सरदार पटेल, एन. व्ही. गाडगीळ आणि जामसाहेब यांनी भग्नावशेषांना भेट दिली. तेव्हा पटेलांनी जाहीर केले: या शुभ नववर्षदिनी आम्ही सोमनाथ मंदिर पुनर्निर्माणाचा निर्णय घेतला आहे.जुनागढ प्रशासन आणि जामसाहेबांनी तत्काळ देणग्या दिल्या. सुमारे ५,००० एकर जमीन मंदिर, संस्कृत विद्यापीठ आणि सांस्कृतिक केंद्रासाठी राखीव ठेवण्यात आली.यानंतर वाद निर्माण झाला. महात्मा गांधींच्या सल्ल्यानुसार सरकारने थेट निधी न देता लोकवर्गणीतून मंदिर उभारण्याचा निर्णय घेतला, जेणेकरून हे राज्यप्राय धार्मिक प्रकल्प न राहता लोकसहभागातून उभे राहिलेले सांस्कृतिक पुनरुत्थान ठरेल.

दरम्यान, तत्कालीन प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरु यांनी या प्रकल्पाला हिंदू पुनरुत्थानवाद म्हणून विरोध केला. परंतु सार्वजनिक देणग्यांमुळे प्रकल्प थांबवता आला नाही.१५ डिसेंबर १९५० रोजी सरदार पटेल यांचे निधन झाले, तरी काम सुरूच राहिले. अखेर ११ मे १९५१ रोजी राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. सोमपुरा शिल्पकारांनी बांधलेल्या मारू-गुर्जर शैलीतील मंदिरात नवीन ज्योतिर्लिंगाची स्थापना झाली. शतकानुशतके कुजबुजत राहिलेली प्रतिज्ञा अखेर दगडात साकार झाली. नेहरू या समारंभाला उपस्थित नव्हते.आज सोमनाथ हे केवळ पर्यटनस्थळ किंवा धार्मिक प्रतीक नाही; ते दगड आणि गाळात लिहिलेले भारतीय संस्कृतीचा इतिहासग्रंथ आहे. त्याची खरी ओळख अखंड वैभवात नसून प्रत्येक विध्वंसानंतर पुन्हा उभे राहण्याच्या मानवी निर्णयात आहे.त्याच्या पायाभूत थरांमध्ये हडप्पाकालीन वसाहती, प्राचीन व्यापारी आणि शांतीच्या शोधात आलेले भक्त सामावलेले आहेत. प्रत्येक पुनर्निर्माण मैत्रक राजे, सोलंकी सम्राट, मराठा राण्या किंवा नवस्वतंत्र भारत यांना ही समाप्ती नाही; आम्ही पुन्हा उभारू हा एक जाणीवपूर्वक केलेला उच्चार होता.

सोमनाथ आपल्याला शिकवते की लवचिकता म्हणजे कधीही न पडणे नव्हे, तर पडूनही कायमचे न राहणे, पुन्हा पुन्हा उभे राहणे. समुद्रकिनारी उभे असलेले हे मंदिर केवळ भगवान शिवाचे स्मारक नाही; तर त्या अदम्य मानवी आत्म्याचे प्रतीक आहे, जो शतकानुशतके समुद्राच्या काठावर येऊन शांतपणे म्हणत राहतो

आम्ही अजूनही येथे आहोत.
आम्ही स्मरण ठेवतो.
आम्ही पुन्हा उभारतो.
आम्ही टिकून राहतो.

# गोगलगाईच्या गतीने सुरु असलेल्या रस्त्याच्या कामाविरोधात नागरिकांचा रस्तारोको

## लेखी आश्वासनानंतर आंदोलकांची माघार

उमरखेड/प्रतिनिधी- हरदडा ते पुसद रस्त्याचे काम अगदी गोगलगाईच्या चालीने अनेक दिवसापासून सुरू असल्याने नागरिकावर उडणारा धुरळा आणि त्यामुळे सुरू असलेली अपघाताची साखळी या कारणाने ढाणकी येथील सर्व पक्षीय नेत्यांनी काल मंगळवारी १२ मे रोजी भर उन्हात हरदडा फाट्यावर रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी त्रस्त असलेल्या शेकडो नागरिकांनी या आंदोलनात स्वयं स्फूर्तीने सहभाग घेतला.

काही दिवसापूर्वी रास्ता रोकोचे निवेदन देऊन सुद्धा एमएसआयडीसी विभागाने कोणतीही कारवाई न केल्याने सदर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. संवेदनशील विषय असताना सुद्धा विभागाचे अभियंता मानापुरे कोणतेही ठोस आश्वासन देत नसल्याने आंदोलक संतप्त झाले होते त्यामुळे काही काळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती अखेर अभियंत्याने कँपनीच्या लेटर पॅडवर ३० जून पर्यंत एका बाजूच्या रस्त्याचे काम पूर्ण करून रहदारी योग्य करण्यात येईल असे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलकांनी आंदोलन मागे घेतले यावेळी उमरखेड व बिटरगाव पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

केंद्र शासनाच्या हॅम योजनेअंतर्गत पुसद ते हरदडा रस्त्याचे काम सुरू असून ठेकेदाराच्या नियोजन शून्यतेचा फटका नागरिकांना बसत आहे. संपूर्ण रस्ता खोदून ठेवल्याने तसेच ठीक ठिकाणी खड्डे पडल्याने दररोज अपघात घडत आहेत या रस्त्यावर रहदारी भरपूर असल्याने हजारो लोकांना दररोज त्रासाचा सामना करावा लागत असल्याने ढाणकी येथील सर्वपक्षीय नेत्यांनी चार मे रोजी निवेदन देऊन रस्ता त्वरित सुरू करण्याची मागणी केली होती परंतु विभागाने कोणतीही कारवाई न केल्याने हे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले रस्त्याचा त्रास बघता शेकडो नागरिक स्वयं स्फूर्तीन आंदोलनात सहभागी झाले होते.

दरम्यान आंदोलन सुरू झाल्यानंतर उशिरा पोहोचलेल्या एम एस आय डी सी विभागाचे अभियंता संजय मानापुरे यांनी आंदोलकांनाउडवा उडवीची उत्तरे दिल्याने काही काळ तणाव निर्माण झाला होता. परंतु सहाय्यक पोलीस निरीक्षक विनायक रामोड व उपनिरीक्षक गणेश मुंढे, उपनिरीक्षक सागर अन्नमवार यांनी मध्यस्थी केल्याने आंदोलक शांत झाले. जोपर्यंत कँपनीच्या लेटरहेड वर लेखी आश्वासन देणार नाही तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका आंदोलकांनी घेतली होती.

या वेळी कॉंग्रेसचे बाळासाहेब चंद्रे पाटील, शिवसेनेचे दत्त दिगंबर वानखेडे, मनसेचे तालुकाध्यक्ष सादिक शेख, आझाद समाज पार्टीचे जॉन्टी विणकरे, प्रणिता कांबळे, शेख बशीर, गजानन मिटकरे, संबोधी गायकवाड,संभाजी गोरटकर, प्रशांत जोशी, सैय्यद माजीद, बाबुराव नरवाडे गजानन चंद्रे, शादुल भाई, राहूल नरवाडे, चंद्रकांत कानकाटे, बंडू कवडे, बाळू पायघन, बालाजी काळे, सुनिल बुरसे, बंटी वाळके, मारोती वानखेडे, विलास पायघन, शिवाजी वानखेडे, मुन्ना रहेमान, हाफीज नवाब, बिबन कुरेशी सह शेकडो कार्यकर्त व नागरीक उपस्थित होते. यावेळी पोलीस व आर सी पी पथकाने चोख बंदोबस्त ठेवला होता. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे अत्यवस्थ आणि आजारी प्रवाशांना त्रास होऊ नये म्हणून आंदोलनादरम्यान ॲम्बुलन्स व आजारी प्रवासी असलेल्या ऑटोला आंदोलनकर्त्यांनी रस्ता मोकळा करून देऊन माणुसकीचा प्रत्यय दिला होता.


तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय नांदेड
प्रशासकीय इमारत हिंगोली गेट जवळ,चिखलवाडी,
नांदेड. पिन-४३१६०१

जा.क्र.२०२५/मृत्यु प्रमाणपत्र/सिआर-२८०/२०२५ दिनांक ११/०५/२०२६

**जाहीर प्रगटन (मृत्यु नोंदणी आदेशासाठी)**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, विनोद सुभाष उर्फ सुभाषचंद दरडा वय ४४ रा.प्लॉट नं.१३, न्यु.मोंढा मगनपुरा,बळीरामपुर नांदेड ता. जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचे वडीलाचे मृत्यु प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

मृत्यु झालेल्याचे नाव सुभाष मुलचंद रा.प्लॉट नं.१३, न्यु. मोंढा मगनपुरा, बळीरामपुर नांदेड ता.जि.नांदेड सदर व्यक्तीचा भगवती हॉस्पीटल, शिवाजीनगर, नांदेड ता.जि.नांदेड या ठिकाणी दिनांक ११.०१.२०२५ या दिवशी मृत्यु झाला असून मृत्यु प्रमाणपत्र मिळणेकरीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात अर्जदार यांनी दिनांक २७.०४.२०२६ रोजी तहसिल कार्यालय नांदेड येथे अर्ज पुराव्यासह सादर केला आहे.

वरील मृत्यु दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक-११/०५/२०२६
स्थळ-नांदेड

स्वाक्षरित/-
तहसिलदार नांदेड तथा
तालुका दंडाधिकारी नांदेड करिता



सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# घराला लागलेल्या आगीत पावणे दोन लाखाचे नुकसान

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील नागराळ येथे उष्णतेमुळे झालेल्या शॉर्टसर्किटमुळे एका कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याची घटना घडली आहे. या दुर्घटनेत घरातील रोख रक्कम,इलेक्ट्रिक साहित्य, अन्नधान्य तसेच महत्त्वाची कागदपत्रे जळून खाक झाली असून अंदाजे १ लाख ७० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

नागराळ येथील बालाजी गणपतराव काठेवाडे (वय ५०) यांनी मारखेल पोलीस ठाण्यात दिलेल्या अर्जानुसार, दि. ४ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ९ वाजता ते व त्यांचा मुलगा माधव हे शेतात जागलीसाठी गेले होते. घरात पत्नी उषाबाई, आई कोंडाबाई व सुन स्वप्नाली या अंगणात झोपल्या होत्या. रात्री सुमारे १०.१५ वाजण्याच्या सुमारास घरातून धूर व ज्वाळा निघत असल्याची माहिती सुन स्वप्नाली हिने फोनद्वारे दिली.ही माहिती मिळताच बालाजी काठेवाडे व त्यांचा मुलगा गावकऱ्यांच्या मदतीने तातडीने घरी पोहोचले आणि आग विझविण्याचा प्रयत्न केला. पाहणीअंती उष्णतेमुळे घरातील इलेक्ट्रिक वायर वितळून शॉर्टसर्किट झाल्याने आग लागल्याचे निदर्शनास आले. या आगीत गादीखाली ठेवलेली ७५ हजार रुपयांची रोख रक्कम, कपडे, अन्नधान्य, कुलर, फॅन, टीव्ही यांसह विविध इलेक्ट्रिक साहित्य जळून नष्ट झाले. तसेच आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक पासबुक, राशन कार्ड, जन्म प्रमाणपत्रे, उत्पन्न प्रमाणपत्र, मृत्यू प्रमाणपत्र तसेच मुलगा माधव याची शैक्षणिक कागदपत्रे आगीत भस्मसात झाली. घरातील लाकडी पलंग व कपाटाचेही मोठे नुकसान झाले आहे. या प्रकरणी मारखेल पोलीस ठाण्यात आकस्मात आगीची नोंद करण्यात आली असून पुढील तपास स.पो.नि. हुंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# खंबाळा ग्रामस्थांच्या लढ्याला यश;संध्याताई राठोड यांच्या पाठपुराव्याने पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी



मांडवी/प्रतिनिधी-निम्न पैनगंगा प्रकल्पांतर्गत पुनर्वसनासह विविध न्याय्य मागण्यांसाठी गेल्या अनेक दिवसांपासून संघर्ष करणाऱ्या किनवट तालुक्यातील खंबाळा गावातील ग्रामस्थांच्या आंदोलनाला अखेर मोठे यश मिळाले आहे. तत्कालीन भाजप नांदेड उत्तर महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ. संध्याताई प्रफुल्लजी राठोड यांच्या सातत्यपूर्ण आणि प्रभावी पाठपुराव्यामुळे राज्य शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत आवश्यक कार्यवाही सुरू केली आहे.

खंबाळा येथील शेतकरी व ग्रामस्थ आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी १७ फेब्रुवारीपासून कुटुंबासह साखळी तसेच आमरण उपोषण आंदोलन करत होते. आंदोलनाची तीव्रता वाढत असल्याचे लक्षात घेत सौ. संध्याताई राठोड यांनी २२ फेब्रुवारी रोजी उपोषणस्थळी भेट देत ग्रामस्थांच्या अडचणी आणि व्यथा जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी ग्रामस्थांना न्याय मिळवून देण्यासाठी पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले होते. यानंतर केवळ आश्वासनांवर न थांबता सौ. राठोड यांनी २७ फेब्रुवारी रोजी राज्याचे महसूलमंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रत्यक्ष भेट घेत खंबाळा ग्रामस्थांच्या मागण्यांचे गांभीर्य त्यांच्या निदर्शनास आणून दिले. या भेटीनंतर मंत्री महोदयांनी सकारात्मक भूमिका घेत नागपूर येथील विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालकांना संबंधित प्रकरणात तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याचे लेखी आदेश दिले. मंत्री महोदयांच्या आदेशाचे पत्र सौ. संध्याताईंनी खंबाळा गावच्या नवनिर्वाचित सरपंचांकडे सुपूर्द केले. शासनस्तरावर हालचाली सुरू झाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनाला यश मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. यावेळी प्रफुल्लजी राठोड, खंबाळा गावचे सरपंच तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# अधिक मासानिमित्त माहूरमध्ये महिनाभर अखंड अन्नदान

माहूर/प्रतिनिधी-श्रीक्षेत्र माहूर येथे अधिक मास अर्थात पुरुषोत्तम मासाच्या पावन पर्वानिमित्त भक्ती, सेवा आणि समाजप्रबोधनाचा अनोखा संगम अनुभवायला मिळणार आहे. येथील श्री आनंद धाम आश्रमात १७ मे २०२६ ते १५ जून २०२६ या कालावधीत भव्य अखंड अन्नदान महायज्ञ व दत्त नामस्मरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमणार आहे.

महाराष्ट्राचे स्वच्छता दूत तथा आयटीआय प्रमुख मार्गदर्शक परमपूज्य श्री साईनाथ महाराज वसमतकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा आध्यात्मिक, सामाजिक व जनजागृतीपर उपक्रम पार पडणार आहे. समाजसेवा, अन्नदान, स्वच्छता अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन व अध्यात्म यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या कार्यातून सातत्याने पाहायला मिळतो.राज्यभर विविध ठिकाणी दत्त नामाचा जागर घालत जनप्रबोधन करणारे श्री साईनाथ महाराज वसमतकर यांनी शिवनेरी किल्ल्यावर दत्त नामस्मरण, अटारी बॉर्डर येथे राष्ट्रभक्तीपर



नामगजर, तसेच गिरनार पर्वतावर सात दिवसांचा सप्ताह व नामस्मरण यांसारखे उपक्रम यशस्वीपणे राबविले आहेत. त्यांच्या दशसूत्री कार्यक्रमातून स्वच्छता, व्यसनमुक्ती, शिक्षण, अध्यात्म आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविला जात आहे. या पवित्र सोहळ्याची सुरुवात १७ मे रोजी भव्य अन्नदानाच्या पहिल्या पंगतीने होणार असून, ही सेवा शिरीष भाऊ गोरठेकर, कैलास भाऊ गोरठेकर व समस्त गोरठेकर परिवार यांच्या वतीने करण्यात येणार आहे. तर अखंड अन्नदान महायज्ञाचा समारोप १५ जून रोजी परमपूज्य महाराजांचे जन्मगाव बितनाळ येथील भाविकांच्या हस्ते होणार आहे. या महिनाभर चालणाऱ्या सोहळ्यात दररोज दत्त नामस्मरण, हरिनाम सप्ताह, भजन, कीर्तन, प्रवचन, अन्नदान व समाजप्रबोधनपर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भक्ती आणि सेवाभावाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे.याच पार्श्वभूमीवर परमपूज्य श्री साईनाथ महाराज वसमतकर यांच्या दशसूत्री कार्यक्रमाची सविस्तर माहितीही भाविकांना देण्यात येणार असून सामाजिक, आध्यात्मिक व जनजागृती संदर्भातील विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांची अर्धापूर तहसील कार्यालयास भेट; विविध विभागांच्या कामकाजाची केली पाहणी

नांदेड/प्रतिनिधी-जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सोमवारी अर्धापूर तहसील कार्यालयास अचानक भेट देत विविध विभागांच्या कामकाजाची सविस्तर पाहणी केली. यावेळी त्यांनी महसूल विभागासह पंचायत समिती, गट विकास अधिकारी कार्यालय, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, रोजगार हमी योजना विभाग, पुरवठा विभाग, उपकोषागार कार्यालय आणि भूमि अभिलेख कार्यालयाला भेटी देऊन कामकाजाचा आढावा घेतला.

तहसील कार्यालयात त्यांनी महसूल विभागातील सर्व कार्यासनांना भेट देत प्रत्येक विभागाच्या जाबचार्टची तपासणी केली. तसेच आरटीएस अंतर्गत नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवांची पडताळणी करून प्रलंबित प्रकरणे नसल्याची खात्री केली. अभिलेख कक्षालाही भेट देऊन अभिलेखांच्या नक्कल वितरण प्रक्रियेची पाहणी केली व कामकाज अधिक सुलभ आणि प्रभावी करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.यावेळी तहसील कार्यालयाच्या सभागृहात शासकीय जमिनींच्या अभिलेख पडताळणीसाठी विशेष शिबिर सुरू होते. नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि कर्मचारी विविध गटांच्या नोंदींची पडताळणी करत होते. जिल्हाधिकाऱ्यांनी या कामाचा आढावा घेत उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच तहसील कार्यालयाच्या एकूण कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले.

# खानापुरात राज्य महामार्गावर वाहतुकीचा फज्जा;दैनंदिन वाहतूक कोंडीने वाहनधारक त्रस्त



देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील खानापूर फाटा अत्यंत वरदळीचा व मुख्य चौक असणारा थांबा आहे. या थांब्यावर तेलंगणा, आंध्र प्रदेश,कर्नाटक राज्यातून वाहने दाखल होतात. त्यामुळे येथे निश्चितच प्रवाशांची वर्दळ असते. त्यामुळे पुणे-देगलूर, नांदेड-देगलूर जाणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्स मध्ये प्रवासी मिळवण्यासाठी स्पर्धा होत असल्याचे नेहमी पहावयास मिळत आहे.

कर्नाटक राज्यामध्ये जाणारी लाल रेतीची वाहतूक याच मार्गावरून होत असल्याने रेती घेऊन जाणारे हायवा वाहने अत्यंत वेगाने धावतात. फाट्यावर दोन्ही बाजूने अतिक्रमण मोठ्या प्रमाणात वाढले असून हे अतिक्रमण तात्काळ हटवण्याची मागणी नागरिकातून केल्या जात आहे. तसेच बेशिस्त वाहनधारकांच्या वाहन चालवण्यामुळे वाहतुकीची मोठी कोंडी ही दैनंदिन समस्या झाली आहे. वाहतुक कोंडी इतकी मोठी झाली की वाहतुकीच्या रांगा लांबच लांब ४ ते ५ कि.मी. अंतरापर्यंत लागल्या होत्या. तब्बल दोन तास वाहतूक कोंडी झाली होती. खानापूर एमआयडीसी परिसरापासून वाहनाच्या रांगा लागल्या होत्या. या वाहतूक कोंडीमुळे वऱ्हाडी मंडळीची मोठी गच्छंती झाल्याचे दिसून आले. कडक उन्हात झालेल्या वाहतूक कोंडीमुळे लग्न कार्यासाठी निघालेली वऱ्हाडी अडकून पडल्यामुळे वेळेवर लग्न लावण्याचे वऱ्हाडी मंडळाचे स्वप्न भंगले. या वाहतूक कोंडीमुळे अनेक रुग्णांनाही वेळेवर दवाखान्यात पोहोचता आले नाही. चाकरमान्यांनाही या वाहतूक कोंडीचा समस्येचा फटका बसला शेवटी या वाहतूक कोंडीचा व्हिडिओ समाज माध्यमावर प्रसारित झाल्यानंतर देगलूर पोलीस घटनास्थळी दाखल होत वाहतूक कोंडीची समस्या सोडविली या कामी खानापूर येथील युवकांनीही मदत केल्याचे दिसून आले. या वाहतुक कोंडीवर सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामपंचायत कार्यालय खानापूर यांनी लक्ष देऊन रस्ता अतिक्रमण मुक्त करून कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी नागरिकातून केल्या जात आहे.

पान १ वरुन

## मंत्र्यांसह अधिकाऱ्यांचे...

आदेश दिले आहेत.सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, यापुढे अत्यावश्यक कारणांशिवाय कोणत्याही मंत्री किंवा अधिकाऱ्याला परदेश दौऱ्याची परवानगी दिली जाणार नाही. याआधी मंजूर झालेले दौरेही रद्द करण्यात येणार आहेत. दरम्यान, मंगळवारी विधिमंडळातील १२ आमदारांचा जपान दौरा रद्द करण्यात आला असून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी त्यास मंजुरी दिली आहे.दरम्यान, राज्य सरकारने मंत्र्यांच्या ताफ्यांबाबतही महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.


## CHANGE IN NAME

My Old Name is **RASHEED** which Now I am changing New Name **RASHEED GULAM SARWAR** Hence Forth my all correspondance will be done as per my New Name Please consider the same

Sign by

**RASHEED GULAM SARWAR**

9-32 Dargapura Kandhar Farzana Manzil,

Dargapura Kandhar VTC Kandhar Dist Nanded

Stat Maharashtra - 431714

mobile No.9766557299



## जाहीर प्रगटन

दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर,लोहा, ता.लोहा जि.नांदेड श्रीमती पी.व्ही.चिद्रे यांच्या न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज (आर.जे.ई.) क्र.६८/२०२६

पदमीनबाई व इतर वि निरंक

अर्जदार : १) पदमीनबाई नरबा लोहकरे वय ७३ वर्षे, धंदा घरकाम, २) कामाजी नरबाजी लोहकरे वय ४३ वर्षे धंदा शेती, ३) माधवराव नरबाजी लोहकरे वय ४० वर्षे धंदा शेती, ४) बालाजी नरबाजी लोहकरे वय ३८ वर्षे धंदा शेती सर्व रा.कांजळा ता.लोहा जि.नांदेड, ५) सागरबाई दिगांबर जाधव वय ५२ वर्षे धंदा घरकाम, रा.करमाळा ता.लोहा जि.नांदेड, ६) वच्छलाबाई संभाजी शिंदे वय ५० वर्षे धंदा घरकाम रा.जोमेगाव ता.लोहा जि.नांदेड, ७) आरुणाबाई भगवान मोरे वय ४७ वर्षे धंदा घरकाम रा.जोशी सांगवी ता.लोहा जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निल

दावा : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट (VIII) १८२७ च्या नियमानुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज.

ज्याअर्थी नरबा मारोती लोहकरे हे दिनांक २१/०८/२०२५ रोजी कांजळा ता.लोहा येथे मरण पावले आणि वरिल अर्जदार क्र.१ ही पत्नी, अर्जदार क्र.२ ते ४ हे मुले व अर्जदार क्र.५ ते ७ ह्या मयताची मुलगी आहे. अर्ज सादर केला आहे. त्यापेक्षा सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या घोषणेच्या तारखेपासून एक महिन्याचे आत वरिल न्यायालयामध्ये हजर होउन आक्षेप नोंदवावा, आणि याद्वारे असे जाहिर केले गेले आहे की, सदर मुदत संपण्यापुर्वी आक्षेप घेतला नाही तर सदरहू कोर्ट अर्जदार ह्यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेउन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत अनुसयाबाई मोतीराम गुध्दे यांचे कायदेशिर वारसाचे प्रमाणपत्र देईल.

आज तारीख-०५/०५/२०२६

पुढील नेमलेली तारीख-१५/०६/२०२६

स्वाक्षरित/-
**क.लि.**

स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय,क.स्तर,लोहा



जा.क्र.नांवाशमनपा/क्षे.का.०१/नापवि/१५०/२०२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक : २४-४-२०२६

## जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.NT/०१/१३३३२/क्षे.का.क्र.१ तरोडा-सांगवी**

**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **श्री प्रविण मारोतराव हांडे** रा.**तरोडा खु.**नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, ता.नि.भु.अ.पत्र क्र.**१०५१/०९ दि.३०.१०.२००९ तरोडा बु. गट नं.४० पैकी** प्लॉट क्रं.**५०,५१ पिन क्र.४०१०३०७५०२४** सौ.**कांचन कैलास धुळे** यांच्या नावे असलेली मालमत्ता यांचेकडुन अर्ज **खरेदीखत क्र.१-१९२२-२०२६ दि.१७/०२/२०२६** च्या आधारे विकत घेतली आहे/वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर आकारणी नोंद वहीत घेण्यासाठी जाहिर प्रगटन देण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून (१५) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. अन्यथा अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नांवे वरील प्रमाणे मालमत्ता नोंदविण्यात येईल.

**चर्तुःसिमाः- पुर्व**- मारोतराव गणपतराव यांचे शेत आहे, **पश्चिम-**२० फुट रुंद रोड आहे, **दक्षिण-**प्लॉट नं.५२ आहे, **उत्तर-**प्लॉट नं.४९ आहे.

स्वाक्षरित/-
**सहाय्यक आयुक्त,**
क्षे.का.क्रं.०१ तरोडा सांगवी,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड



## जाहीर प्रगटन

मे.सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,कंधार यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१३६/२०२६

(CNR No.MHND100004732026)

अर्जदार : १) श्रीमती शालाबाई भ्र.पुरुषोत्तम पानपट्टे वय ५२ वर्षे व्यवसाय-घरकाम, २) मनोज पि.पुरुषोत्तम पानपट्टे वय २६ वर्षे व्यवसाय शेती दोघेही रा.काटकळंबा ता.कंधार जि.नांदेड, ३) निकीता भ्र.देवराव जाधव वय २१ वर्षे व्यवसाय-घरकाम रा.खराब खंडगाव ता.मुखेड जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदार नं.१ चा अर्जदार नं.२ हा मुलगा असून अर्जदार क्र.३ ही मुलगी आहे. अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ यांचे वडील नामे पुरुषोत्तम पि.आनंदराव पानपट्टे हे होता तो दिनांक ०५/०५/२०२५ रोजी मयत झाले आहेत. वरील अर्जदाराचे व म्हणणे आहे की, मयत पुरुषोत्तम पि.आनंदराव पानपट्टे यांचे अर्जदारांशिवाय इतर कोणीही वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत पुरुषोत्तम पि.आनंदराव पानपट्टे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत पुरुषोत्तम पि.आनंदराव पानपट्टे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-१८/०६/२०२६

आज रोजी दि.१५/०४/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**वरिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार



## जाहीर प्रगटन

मे.सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,कंधार यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१३३/२०२६

(CNR No.MHND100004712026)

अर्जदार : १) कपिल पि.कांतराव सरोदे, वय ४१ वर्षे, व्यवसाय-व्यापार रा.फ्लॅट नं.१७ इंद्रायणी पार्क,मोशी पुणे ता.हवेली जि.पुणे, २) कैलाश पि.कांतु सरोदे, वय ३१ वर्षे, व्यवसाय-शिक्षण रा.शिरशी बु. ता.कंधार जि.नांदेड, ३) छाया भ्र.परमेश्वर वाघमारे वय ३६ वर्षे, व्यवसाय-घरकाम रा.कोतेकलुर ता.देगलूर जि.नांदेड, ४) माया भ्र.संजय सोनकांबळे वय ३४ वर्षे, व्यवसाय-घरकाम रा.मोशी शिवाजीवाडी पुणे ता.जि.पुणे, ५) सुमेध पि.कांतराव सरोदे वय २४ वर्षे, व्यवसाय-वकिली, ६) सुमित्राबाई भ्र.कांतु सरोदे वय ६८ वर्षे, व्यवसाय-घरकाम वरील दोघे रा.फ्लॅट नं.१७ इंद्रायणी पार्क,मोशी पुणे ता.हवेली जि.पुणे

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ व २ हे सख्खे भाउ असुन अर्जदार क्र.३ व ४ ह्या त्यांच्या सख्ख्या बहिणी आहेत. तर अर्जदार क्र.५ हा अर्जदार क्र.१ ते ४ यांचा सावत्र भाउ आहे. तर अर्जदार १ हि अर्जदार क्र.१ ते ४ यांची सावत्र आई आहे. अर्जदार क्र.१ ते ५ यांचे वडील व अर्जदार क्र.६ चे नामे सुर्यकांत उर्फ कांतराव उर्फ कांतु सरोदे हे होते ते दिनांक १२/०१/२०११ रोजी मयत झाले आहेत. सुर्यकांत उर्फ कांतराव उर्फ कांतु सरोदे यांची पहिली पत्नी नामे संमित्राबाई भ्र.कांतु सरोदे हि होती. ती दिनांक ०६/१२/२००० रोजी मयत झाल्यानंतर अर्जदार क्र.१ ते ४ च्या वडिलांनी अर्जदार क्र.६ हिच्याशी लग्न केले व पहिल्या पत्नीच्या प्रेमापोटी व स्मरणार्थ लग्नानंतर अर्जदार नं.६ चे नाव सुधा लग्नानंतर सुमित्राबाई असे ठेवण्यात आले. दुसरी पत्नी सुमित्राबाई हिस सुर्यकांत उर्फ कांतराव उर्फ कांतु सरोदे यांच्यापासुन अर्जदार क्र.५ जन्माला आला आहे. वरील अर्जदाराचे म्हणणे आहे की, मयत सुर्यकांत उर्फ कांतराव उर्फ कांतु सरोदे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत सुर्यकांत उर्फ कांतराव उर्फ कांतु सरोदे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत सुर्यकांत उर्फ कांतराव उर्फ कांतु सरोदे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-१२/०६/२०२६

आज रोजी दि.२२/०४/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

# जात-पक्ष न पाहता जनतेचे प्रश्न सोडवण्यास कटिबद्ध-आ.कोहळीकर

## महिलांसाठी अत्याधुनिक प्रसाधनगृह,शादीखान्यासाठी १५ लाखांचा निधी;शहर विकासावर प्रशासनाला खडेबोल

हदगाव/प्रतिनिधी-मी राजकारण करताना जात, पक्ष किंवा कोण माझा विरोधक आहे हे कधीच पाहत नाही. माझ्यासाठी हदगाव विधानसभा क्षेत्रातील सर्वसामान्य जनता आणि त्यांच्या समस्या महत्त्वाच्या आहेत, असे ठाम प्रतिपादन आ.बाबुराव कदम कोहळीकर यांनी केले. हदगाव येथील उपविभागीय कार्यालयात प्रशासकीय आढावा बैठक घेतल्यानंतर नगरपरिषद सभागृहात पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी शहर विकास, नागरी सुविधा आणि विविध समाजांच्या प्रश्नांवर स्पष्ट भूमिका मांडली. माझ्या विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक समाजाशी माझे थेट सामाजिक नाते आहे. नागरिक कोणत्याही भीतीशिवाय त्यांच्या वैयक्तिक, सामाजिक आणि गावाच्या समस्या माझ्यापर्यंत पोहोचवतात. जनतेचे प्रश्न सोडविणे हेच माझे राजकारण आहे, असे सांगत त्यांनी महिलांसाठी अत्याधुनिक व सुरक्षित प्रसाधनगृह उभारण्यात येणार असल्याची घोषणा केली. पहिल्या टप्प्यात पंचायत समिती परिसरात हे प्रसाधनगृह उभारण्यात येणार असून महिलांच्या सन्मानासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी मुस्लिम समाजाच्या



शादीखान्याच्या दुरुस्तीसाठी १५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले. पंखे, इलेक्ट्रिकल वायरिंग आणि इतर मूलभूत सुविधांसाठी हा निधी वापरण्यात येणार असून समाज कोणताही असो, विकासात कुणालाही वंचित ठेवणार नाही, असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला. शहरातील सांडपाणी समस्येवर बोलताना आ. कोहळीकर यांनी नगरपरिषद प्रशासन आणि नगरसेवकांना चांगलेच खडे बोल सुनावले. शहरातील सांडपाणी रस्त्यावर येत असेल तर ते जनतेसाठी लाजिरवाणे आहे. नवीन नगरसेवक आणि नगराध्यक्षांनी ठोस नियोजन करावे. शहरात सांडपाणी साचणार नाही यासाठी तातडीने उपाययोजना करा. प्रस्ताव तयार करा, निधीची कमतरता पडू देणार नाही, असे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. जुन्या तलावाच्या सुशोभीकरणा-बाबतही त्यांनी प्रशासनाला सूचना दिल्या. हा तलाव पर्यटनाच्या दृष्टीने विकसित होऊ शकतो. प्रशासनाने केवळ फाईली फिरवू नयेत, तर ठोस प्रस्ताव तयार करून कामाला गती द्यावी, असे ते म्हणाले. शहरातील भविष्यातील वाहतूक कोंडी लक्षात घेऊन रिंगरोड प्रकल्पालाही प्राधान्य देण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. शहर विस्ताराच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, प्रशासकीय बैठकीनंतर आ. बाबुराव कदम कोहळीकर यांनी घेतलेल्या आक्रमक आणि स्पष्ट भूमिकेची हदगावच्या शहरात जोरदार चर्चा सुरू आहे.

# सुनील तटकरे-पटेल पुढील निवडणुका भाजपच्या चिन्हावर लढणार-आ.रोहित पवार

पुणे:राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे कार्याध्यक्ष खा.प्रफुल्ल पटेल व प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे २२ आमदारांसह आगामी काळात भाजपकडून निवडणूक लढविण्यासाठी तयार असल्याचा खळबळजनक आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आ.रोहित पवार यांनी केला आहे. या आरोपानंतर खा.तटकरे यांनी सडेतोड उत्तर देत आ.रोहित पवारांचा दावा फेटाळला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांनी



मंगळवारी रात्री ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतल्यानंतर राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. या भेटीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी मोठा दावा करत राजकीय खळबळ उडवून दिली. पत्रकार परिषदेत बोलताना रोहित पवार म्हणाले की, सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल हे २२ आमदारांसह भाजपच्या चिन्हावर निवडणूक लढवण्याच्या तयारीत आहेत. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षातील काही आमदार देखील भाजपच्या संपर्कात आहेत. मावळचे आमदार सुनिल शेळके हे देखील भाजपमधून निवडणूक लढवतील, असा दावाही त्यांनी केला.रोहित पवारांच्या या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना सुनील तटकरेंनी अत्यंत थोडक्यात उत्तर देत विषय संपवला.

# पंतप्रधान मोदींच्या ताफ्यात ५०% कपात

नवी दिल्ली:देशात निर्माण झालेल्या पेट्रोल-डिझेल संकटाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत:पासून इंधन बचतीची अंमलबजावणी सुरू करत मोठा निर्णय घेतला आहे. आपल्या अधिकृत ताफ्यातील वाहनांची संख्या निम्मी करण्याचे आदेश दिल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे. याबाबत स्पेशल प्रोटेक्शन ग्रुप (एसपीजी) ला देखील आवश्यक निर्देश देण्यात आले आहेत.

पंतप्रधानांच्या अधिकृत ताफ्यात ५० टक्के कपात करण्यात आली असून वडोदरा तसेच आसाममधील हिमंता बिस्वा सरमा यांच्या शपथविधी कार्यक्रमासाठी झालेल्या गुवाहाटी दौऱ्यात ही कपात स्पष्टपणे दिसून आली. सुरक्षेची कोणतीही तडजोड न करता इंधन बचतीला प्राधान्य देण्याचा संदेश पंतप्रधानांनी दिला आहे.तसेच ताफ्यात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र त्यासाठी नवीन वाहनांची खरेदी न करता उपलब्ध साधनसामग्रीचा वापर करण्यावर भर देण्यात आला आहे. याशिवाय सरकारी कामकाजात ऑनलाइन बैठका वाढवण्यासही प्राधान्य देण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत

# 'स्वच्छ,सुंदर आणि निरोगी किनवट'साठी नगरपरिषदेचा पुढाकार

## दारव्हा येथील स्वच्छता पथकाकडे जबाबदारी

किनवट/प्रतिनिधी-स्वच्छतेतून सुंदर शहर करण्यासाठी किनवट नगरपरिषदेने पावसाळ्या-पूर्वीच्या स्वच्छतेची कामे प्रायोगिक तत्त्वावर दारवा (दिग्रस) येथील एका कम्पनीकडे सोपवले आहे. तर पुढच्या पंधरवड्यात उर्वरित काम दुसऱ्या कम्पनीकडे सोपवण्यात येणार आहे. समिक्षेनंतरच कम्पनीची निवड करण्यात येणार असल्याचे नगरसेवक प्रशांत कोरडे यांनी सांगितले. विशेष स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ नगराध्यक्षा सौ.सुजाता एंड्रलवारांच्या आणि प्रभाग क्र.एकच्या नगरसेवकांच्या उपस्थितीत करण्यात आलाय. नागरिकांनी सुद्धा आपला परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी नगरपरिषदेला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


किनवट शहर स्वच्छतेची जबाबदारी ही केवळ प्रशासनाची नसून प्रत्येक नागरिकाची सुद्धा असल्याचे सांगत, शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेऊन नगरपरिषदेला सहकार्य करण्याचे आवाहन देखील नगराध्यक्षा सौ.एंड्रलववार यांनी केले. पावसाळ्यात नाल्यांची तुंबई होऊन प्रशासनाची डोकेदुखी टाळण्यासाठी पावसाळ्यापूर्वीची नाल्या सफाई, घनकचऱ्याच्या व्यवस्थापनाची कामे या मोहिमेअंतर्गत पूर्ण केली जात आहेत. शहरातील सर्वच प्रभागांमध्ये स्वच्छताविषयकची सर्व कामे विदर्भातील दारव्हा येथील स्वच्छता पथकांमार्फत रस्ते, नाल्या, सार्वजनिक ठिकाणे



तसेच कचरा साचणाऱ्या परिसर स्वच्छतेची कामे पथकाकडून करवून घेतली जात आहेत हे विशेष. शहरवासीयांमध्ये स्वच्छतेच्या बाबतीत जाणीवजागृती करण्यासाठी नगरपरिषद विविध उपक्रम राबविणार असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली. स्वच्छ, सुंदर आणि निरोगी शहरासाठी चालू केलेल्या मोहिमेत मुख्याधिकारी मुगाजी काकडे, कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव, शिवसेना गटनेते सुरज सातुरवारांसह नगरसेविका/सभापती सौ.प्रीती धीरज नेम्मानीवार, नगरसेवक संतोष मरस्कोल्हे, नगरसेवक चंद्रशेखर रंगराव नेम्मानीवार, अश्विनी जागर्लावार, सभापती श्रीराम नेम्मानीवार, सामाजिक कार्यकर्ते मारोती मुनेश्वर, धीरज नेम्मानीवार तसेच शिवसेनेचे संतोष येलचलवार, राजेश जोशी आणि स्विकृत नगरसेवक प्रशांत कोरडे यांची उपस्थिती होती.

# डॉ.संजय तुंगार यांचे १५ रोजी व्याख्यान

नांदेड/प्रतिनिधी-नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केन्द्राच्या वतीने शुक्रवार दि. १५ मे २०२६ रोजी निवृत्त अपर पोलीस अधीक्षक डॉ. संजय तुंगार यांचे 'सामान्यांसाठी सायबर सुरक्षा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.



नांदेड येथील आर्य समाजाचे नेते कै.डॉ.देवदत्त तुंगार व डॉ.शारदा तुंगार (जिंदम) यांचे सुपुत्र असलेले डॉ.संजय तुंगार यांनी येथील शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातून बी.ए.एम.एस. ही पदवी प्राप्त केली व वैद्यकीय अधिकारी म्हणून रोहा जि.रायगड येथे सेवा सुरू केली. काही कालावधी नंतर वैद्यकीय क्षेत्र सोडून १९९५ साली ते पोलीस खात्यात रुजू झाले.नागपूर,गोंदिया,हिंगोली, पुणे, खंडाळा, नाशिक व नांदेड अशा विविध ठिकाणी त्यांनी उल्लेखनीय कार्य केले.युनायटेड नेशन्सतर्फे दक्षिण सुदानमधे गेलेल्या तुकडीचा ते सभासद होते. पोलीस खात्यातील उत्कृष्ट कार्यासाठी त्यांना अनेक पदके प्राप्त झाली आहेत.पुणे येथे सायबर क्राईम विभागाचे प्रमुख म्हणून त्यांनी कार्य केले आहे.सायबर गुन्हेगारी क्षेत्राचा त्यांचा दीर्घ काळचा अभ्यास आहे.अशा एका अनुभवी व्यक्तीकडून सायबर सुरक्षेविषयी ऐकणे निश्चितच उद्बोधक ठरेल.सायन्स कॉलेज जवळच्या नरहर कुरुंदकर स्मारकात सायं.६-३० वा. होणाऱ्या या व्याख्यानाचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन संचालक डॉ.यशवंत जोशी यांनी केले आहे.


## जाहीर प्रगटन

मे.सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,कंधार यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१७५/२०२६
(CNR No.MHND100002026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | रेणुकाबाई भ्र.बळीराम बोंबले | वय-५३ वर्षे | धंदा-शिक्षण |
| २ | सुभाष पि.बळीराम बोंबले | वय-३२ वर्षे | धंदा-घरकाम |
| ३ | रविकुमार पि.बळीराम बोंबले | वय-३० वर्षे | धंदा-शिक्षण |
| ४ | गिरजाबाई भ्र.रामराव बोंबले सर्व रा.लालवाडी ता.कंधार जि.नांदेड | वय-३० वर्षे | धंदा-शिक्षण |

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे आई वडिल तसेच अर्जदार क्र.४ यांचा मुलगा नामे बळीराम रामराव बोंबले हा होता तो दिनांक २०-११-२०२५ रोजी लालवाडी ता.कंधार येथे मयत झाला आहे. वरील अर्जदाराचे म्हणणे आहे की, मयत बळीराम रामराव बोंबले यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना बळीराम रामराव बोंबले यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत बळीराम रामराव बोंबले यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-१०/०६/२०२६

आज रोजी दि.०८/०५/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/- **कनिष्ठ लिपीक** सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

स्वाक्षरित/- **सहायक अधिक्षक** सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार



## जाहीर प्रगटन

मे.सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,कंधार यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१४१/२०२६
(CNR No.MHND100004782026)

अर्जदार : १) मंगला भ्र.संजय गायकवाड वय ३७ वर्षे व्यवसाय-घरकाम, २) सानवी पि.संजय गायकवाड वय ०७ वर्षे व्यवसाय-शिक्षण अ.पा.क.आई अर्जदार क्र.१ मंगला भ्र.संजय गायकवाड, ३) शिवांश पि.संजय गायकवाड वय ०३ वर्षे व्यवसाय-निरंक अ.पा.क.आई अर्जदार क्र.१ मंगला भ्र.संजय गायकवाड सर्व रा.चिखली ता.कंधार जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदार नं.१ ही अर्जदार क्र.२ व ३ यांची आई असून अर्जदार क्र.२ व ३ हे आपसात सख्खे भाउ बहीण आहेत. अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील नामे संजय पि.व्यंकटराव गायकवाड हे होते तो दिनांक ३१-०८-२०२३ रोजी मयत झाला आहे. वरील अर्जदाराचे व म्हणणे आहे की, मयत संजय पि.व्यंकटराव गायकवाड यांचे अर्जदारांशिवाय इतर कोणीही वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत संजय पि.व्यंकटराव गायकवाड यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत संजय पि.व्यंकटराव गायकवाड यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-१०/०६/२०२६

आज रोजी दि.१६/०४/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/- **वरिष्ठ लिपीक** सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

स्वाक्षरित/- **सहायक अधिक्षक** सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार


# खत माफियांची मुजोरी वाढली;हणेगाव परिसरात डीएपी खताची अवैध दरवाढ

## दोषी कृषी सेवा केंद्रांवर कठोर कारवाईची शेतकऱ्यांची मागणी

देगलूर/प्रतिनिधी-खरीप हंगाम तोंडावर आला असताना हणेगाव परिसरातील अनेक कृषी सेवा केंद्रांमध्ये डीएपी खताची जादा दराने विक्री होत असल्याच्या तक्रारींनी शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा प्रति बॅग २०० ते ३०० रुपयांपर्यंत अधिक पैसे घेतले जात असल्याचा आरोप शेतकऱ्यां-कडून केला जात आहे. त्यामुळे आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, डीएपी खताची अधिकृत किंमत निश्चित असतानाही काही कृषी सेवा केंद्र चालकांकडून कृत्रिम टंचाई निर्माण करून खताचा काळाबाजार केला जात आहे. अनेक ठिकाणी खत उपलब्ध नाही असे सांगितले जाते, मात्र जादा पैसे देणाऱ्यांना लगेच खत पुरवले जात असल्याचेही बोलले जात आहे. यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी त्रस्त झाले असून प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. हणेगाव परिसरातील काही शेतकऱ्यांनी सांगितले की, खत खरेदी करताना पक्के बिल दिले जात नाही. तसेच बिलावर नमूद असलेल्या किंमती पेक्षा प्रत्यक्षात अधिक रक्कम घेतली जाते. त्यामुळे कृषी विभागाने तातडीने गुप्त पथके नियुक्त करून कृषी सेवा केंद्रांची तपासणी करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. प्रशासनाने तत्काळ लक्ष देण्याची गरज शेतकऱ्यांनी जिल्हा कृषी अधीक्षक व तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे कारवाईची मागणी केली असून, जादा दराने खत विक्री करणाऱ्या कृषी सेवा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करावेत, अशी मागणी करण्यात येत आहे. केवळ नोटीस देऊन कारवाईचा दिखावा न करता थेट परवाना रद्द करण्याची ठोस भूमिका प्रशासनाने घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### पेरणीपूर्वीच शेतकरी आर्थिक संकटात

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी आधीच बियाणे, औषधे आणि खतांच्या वाढत्या किमतींमुळे आर्थिक तणावात आहेत. अशा परिस्थितीत खतांच्या जादा दरामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडत असल्याची भावना व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांच्या घामाचा पैसा लुटणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी संतप्त प्रतिक्रिया परिसरातील नागरिकांनी दिली आहे.


CHANGE IN NAME

My old Name is **JITENDER SINGH GULZAR SINGH KHEHRA** which now I am Changing as New Name **JITENDER SINGH KHEHRA** Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.

Sign by
**JITENDER SINGH KHEHRA**
Address:
H. NO. 3-3-1134, Dashmesh Nagar, Behind Ride Well Motors,Dashmesh Nagar,NANDED MAHARASHTRA - 431601 Mob 7020370071



CHANGE IN NAME

My Old Name Is **FARZANA BEGUM** Which Now I am Changing as New Name **FARZANA BEGUM MOHAMMAD RASHEED** hence forth my all correspondance will be done as per my New Name Please consider the same

Sign by
**FARZANA BEGUM MOHAMMAD RASHEED**
9-32 Dargapura kandhar Farzana Manzil,
Dargapura kandhar VTC Kandhar
Dist.Nanded, Stat
Maharashtra - pin code - 431714
Mobile no 9766557299


पान १ वरुन

### पेपरफुटी प्रकरणी कठोर...

शिफारसही करण्यात आली आहे. सीबीआयला चार आठवड्यांच्या आत तपासाचा सद्यस्थिती अहवाल सादर करण्याचे निर्देश द्यावेत, तसेच पारदर्शकतेसाठी केंद्रनिहाय निकाल सार्वजनिक करावेत, अशी मागणीही याचिकेत करण्यात आली आहे. यामुळे कोणत्याही परीक्षा केंद्रावरील संशयास्पद निकाल किंवा अनियमितता तात्काळ लक्षात येऊ शकतील, असा दावा करण्यात आला आहे.दरम्यान, ही याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली असली तरी अद्याप सुनावणीची तारीख निश्चित करण्यात आलेली नाही. नीट पेपरफुटी प्रकरणामुळे लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य अधांतरी राहिले असून संपूर्ण देशाचे लक्ष आता सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेकडे लागले आहे.

### देशात इंधनची कमतरता...

येथे उभारण्यात आलेल्या भूमिगत साठवण प्रकल्पांमध्ये ५.३३ दशलक्ष मेट्रिक टन कच्चे तेल साठवण्याची क्षमता आहे. सध्या हे साठे सुमारे ६४ टक्के भरलेले असून, त्यातून जवळपास ९.५ दिवसांची गरज भागू शकते.तेल कँम्न्यांचा नियमित साठा आणि सामरिक राखीव साठा एकत्रित केल्यास देशाकडे सध्या ६० दिवसांचा कच्च्या तेलाचा व नैसर्गिक वायूचा, तसेच ४५ दिवसांचा एलपीजीचा साठा उपलब्ध असल्याचे पुरी यांनी सांगितले.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४